नियमित फौजदारी खटला नं.११८/२०२२
निशाणी- २०

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- योगेश गोरक्षनाथ चव्हाण
वयः- ४१ वर्षे, पदः-पोलीस हे कॉ ब. नं. ७९३
नेमणुकः- तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-

१. सन २०२१ मी तोफखाना पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी मी गुलमोहर पोलीस चौकी येथे तपासी अमंलदार म्हणुन कार्यरत होतो. सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे देण्यात आल्याचा मला निरोप मिळाला त्यानुसार मी पोलीस स्टेशनला जावुन सदर गुन्हा तपासासाठी लेखी आदेश घेतला. मला दाखविण्यात आलेला आदेश तोच आहे. त्यावर ठाणे अमंलदार दिपक जाधव यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि. २१ देण्यात येत आहे. त्यासोबत मला दैनिक अहवाल, एफआयआरची प्रत, एमएलसी, दवाखाना यादी, फिर्यादी व जखमीचे उपचाराचे केस पेपर देण्यात आले. दि. ०७/०९/२०२१ रोजी घटनास्थळ पंचनामा केला. मला आता दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.त्यास नि.२२ देण्यात येत आहे. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सरकारी दवाखान्यात वैद्यकिय प्रमाणपत्र मिळणेकामी पत्र दिले. मला आता दाखविण्यात आलेले पत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.त्यास नि.२३ देण्यात येत आहे. फिर्यादीने खाजगी दवाखान्यात उपचार घेतले संबंधीचे कागदपत्र प्राप्त केले. त्यानंतर आरोपीला गुन्हयातील वापरलेले हत्यार पोलीस स्टेशनला हजर करण्याबाबत नोटिस दिली. मला आता दाखविण्यात आलेली नोटिस तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.२४ देण्यात येत आहे. पंरतु आरोपीने सदर हत्यार पोलीस स्टेशनला जमा न केल्याने त्याचे विरुध्द भा.

द. वि. कलम २०१ वाढीव कलम लावण्यात आले. याबाबतचे पत्र मला दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे.त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि. २५ देण्यात येत आहे. माझ्या तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, सदर गुन्हयामध्ये फिर्यादीने मुलाला घेऊन जाते असे म्हणाल्याचा राग आल्याने आरोपीने फिर्यादीला व तिच्या आईला लोखंडी रॉडने शिवीगाळ करुन मारहाण केली. सदर गुन्हा आरोपीने केल्याचे निष्पन्न झाल्याने मी त्याचे विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला ओळखतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. आर. पी. शेलोत यांचेकडूनः-

२. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दाखल अमंलदाराने माझ्याकडे गुन्हयाचा तपास दिला त्याची त्यादिवशी पीएसओ म्हणुन डयुटी होती. हे म्हणणे खरे आहे की, दि.०६/०९/२०२१ रोजी आरोपी व फिर्यादी हे पती पत्नी ऐकमेकां विरुध्द फिर्याद देण्यासाठी पोलीस स्टेशनला आले होते. परंतु आरोपीची फिर्याद न घेता एन. सी. नोंदवुन घेतली याबाबत मला सांगता येणार नाही. आरोपीला दवाखान्यात जाण्याकरिता यादी पीएसओ यांनी दिली का हे मला सांगता येणार नाही. गुन्हयाचा तपास करताना आरोपीने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मी काही चौकशी केली नाही. साक्षीदार सांगतो की, आरोपीने दिलेल्या एन.सी. दुस-या पोलीस कर्मचा-याकडे नोंदविण्यात आलेली आहे. त्यादिवशी पीएसओ दिपक जाधव हे होते. हे म्हणणे खरे आहे की, एन. सी. दिपक जाधव यांनीच नोंदवुन घेतली. सदर साक्षीदारास आरोपीच्या विधिज्ञांनी एन. सी. दाखविल्या.

(सरकारी वकिलातर्फे आक्षेप घेण्यात आला की, सदर एन.सी. दोषारोपपत्रासोबत दाखल नाही. आरोपीच्या वकिलांनी सदर एन. सी. अभिलेखावर दाखल करण्याची तयारी दाखविली. )

३. सदर प्रकरणात परस्परविरोधी तक्रारी होत्या का याबाबत मला माहिती नाही. सदर गुन्हयात मी आरोपीचे बयान नोंदविले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी कलम ४१ प्रमाणेची नोटिस दिली त्याच दिवशी कलम १९१ प्रमाणेची नोटिस दिली.

४. हे म्हणणे खरे आहे की, कलम ४१(१)प्रमाणेच्या नोटिसच्या तारखेमध्ये वर्षाच्या रकान्यामध्ये खाडाखोड आहे. घटनास्थळ पंचनाम्यावरिल पंच मी बोलाविले होते त्यांची नावे कल्पना वैराळ आणि स्वाती असे आहेत. साक्षीदार पंचनामा बघुन सांगतो की, सुनिल वैराळ आणि कल्पना वैराळ असे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व त्याची पत्नी हे बोल्हेगांव फाटा येथे राहत होते. आरोपीचे आई वडिल हे तपोवन रोड येथे आले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी त्याचे लहान मुलांना घेऊन आजी आजोबा यांना भेटायला घेऊन गेला होता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीची आई निंबळक येथे राहते.

५. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ सिमेंट क्रॉकीटचा रस्ता आहे व आजीचे घराला तार कंपाऊड आहे. आरोपीच्या आई वडिलांचा मी जबाब घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रकरणातील साक्षीदार हे फिर्यादीचे नातेवाईक, आई व बहिणी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व तिची आई या मुलांना घेण्यासठी तपोवन रोड येथे आरोपीच्या आजीच्या घरी गेल्या आणि तेथे वादविवाद करुन घरातुन बाहेर पडत असताना सिमेंटच्या रस्त्याच्या वर तार कंपाऊडच्या त्यांना जखमा झाल्या याबाबत तपास न करता मी त्यांचे सांगण्यावरुन खोटा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादी व जखमीला रॉडने मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द कोणताही सबळ पुरावा नसताना पुरावा असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.10.04 17:57:30 +0530

( एल. एस. पाढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर

दि. ०४/१०/२०२५
अहमदनगर